दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २६१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२१ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# पनवेल तालुक्यात भाजपचे कमळ फुलले

## भाजप ६ तर महाविकास आघाडी ४ जागांवर विजयी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**तालुक्यातील विविध ग्रामपंचतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन करीत बाजी मारली आहे. विशेषतत्त्वाने अनेक वर्षांपासून शेकापक्षाच्या ताब्यातील करंजाडे, शिवकर, भाताण ग्रामपंचायत भाजपच्या शिलेदारांनी काबीज करत निवडणुकीत जोरदार मुसंडी मारत शेकापसह महाविकास आघाडीला चारी मुंड्या चित केले. एकूणच या निकालात महाविकास आघाडीची बिकट तर शेकापची दयनीय अवस्था झाल्याचे चित्र पहायला मिळाले.**



**शेकापच्या ताब्यातील करंजाडे, शिवकर, भाताण ग्रामपंचायत भाजपकडे; नेरे, दिघाटी, चिंध्रण ग्रामपंचायत राखण्यातही भाजपला यश**

पनवेल तालुक्यातील करंजाडे, शिवकर, भाताण, नेरे, चिंध्रण, केळवणे, कानपोली, दिघाटी, शिरढोण, नितळस या दहा ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक रविवारी पार पडली. या ग्रामपंचायतीचा निकाल आज (मंळवारी) पनवेल तहसिलदार कार्यालयात जाहीर झाला. करंजाडे ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदी मंगेश शेलार, शिवकर ग्रामपंचायतीच्या थेट सरपंच म्हणून आनंद ढवळे, भाताण ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदी तानाजी पाटील, नेरे ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदी प्रकाश घाडगे, चिंध्रण ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदी एकनाथ पाटील, आणि दिघाटी ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदी रजनी ठाकूर विजयी झाले. शिवकर ग्रामपंचायतीत तर भाजपने शेकापला व्हाईट वॉश देऊन पराभवाची धूळ चारली.

करंजाडे ग्रामपंचायतीत ११ पैकी १० जागा जिंकून भाजपने शेकापला मोठा सुरुंग लावला. चिंध्रण ग्रामपंचायतीत ०५, नितळस मध्ये ०३, नेरे मध्ये ६, भाताण ०२, शिरढोण ०३, कानपोली ग्रामपंचायतीत ३ जागा जिंकल्या. या निवडणुकीतही भाजपने सरस कामगिरी करत शेकाप महाविकास आघाडीचे मनसुबे उधळून लावले.

यावेळी सर्व विजयी उमेदवारांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, मनोहर म्हात्रे, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, शशिकांत शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, युवा नेते विनोद साबळे, गुळसुंदे ग्रामपंचायतीचे उपसरपंच शांताराम मालुसरे, कसळखंड ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अनिल पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते कर्णा शेलार, आत्माराम हातमोडे, युवा नेते अविनाश गाताडे, डॉ. संतोष आगलावे, प्रकाश खैरे, प्रभाकर जोशी, निर्दोष केणी, रविंद्र पाटील, वासुदेव गवते यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## कोर्लई किल्ल्याला वणवा : वनखात्याने वेळीच उपाययोजना केल्याने टळले नुकसान



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील ऐतिहासिक प्रसिद्ध असलेल्या कोर्लई किल्ल्याला काल रात्री अचानक कोणा अज्ञाताकडून वणवा लागला असल्याचे येथील लाईट हाऊस मधील कर्मचाऱ्याच्या लक्षात येताच त्यांनी संबंधित वनखात्याचे बोर्लीतील वनपाल वैभव शिंदे यांच्याशी संपर्क साधून कळविण्यात आले असता त्यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने कोर्लई किल्ला गाठला आणि वनरक्षक पंढरिनाथ दिघे, भगवान पिंगळे, पृथ्वीराज चव्हाण यांनी शर्थीचे प्रयत्न करुन वणवा विझविण्यात आल्याने पुढील होणारे संभाव्य नुकसान टाळण्यात यश मिळाल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

## न्हावेखाडी येथील रामबागचे गुरुवारी होणार लोकार्पण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील न्हावेखाडी येथील श्री म्हसेश्वर मंदिर परिसरात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली साकारण्यात आलेल्या रामबाग या उद्यानाचा लोकार्पण सोहळा व त्यानिमित्त सत्यनारायण महापूजा येत्या गुरुवारी (दि. २२) सायंकाळी ०६ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या सोहळ्यानिमित्त हिंदी, मराठी, कोळीगीत, नृत्याविष्कार व हास्याचा डबलबार यांचा समावेश असलेला सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. यामध्ये 'सूर नवा ध्यास नवा' फेम पार्श्वगायक मंदार पिलवलकर, श्वेता सुरेश ठाकूर, शुभम सातपुते, विनोदी अभिनेत्री क्वीन शिवाली परब, 'डान्स+' फेम एस. एस. डान्स फॅमिली ग्रुप, 'याल तर हसाल फेम' संजीवन म्हात्रे हे कलाकार आपली कला सादर करतील. या वेळी उपस्थित राहण्याचे आवाहन मंदिर कमिटी अध्यक्ष सी. एल. ठाकूर यांनी केले आहे.

### सेवानिवृत्ती वेतन प्रकरणांचा जलद गतीने निपटारा होण्यासाठी

## दि.२३ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय पेन्शन अदालतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तसेच जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयातील आस्थापनेवरील अधिकारी–कर्मचारी हे सन–२०२२–२०२३ मध्ये निवृत्त होणार आहेत किंवा झालेले आहेत.

त्यानुषंगाने जिल्ह्यातील राज्य शासकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे कार्यालयीन स्तरावर तसेच वेतन पडताळणी पथकाकडे व रजा मंजूरीच्या कार्यवाहीसाठी प्रलंबित आहेत.

त्यानुषंगाने विविध शासकीय कार्यालयातील प्रलंबित सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे जलद गतीने निपटारा करण्याकरिता शुक्रवार, दि.२३ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी ३.०० वा.जिल्हा नियोजन समिती कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड–अलिबाग येथे जिल्हास्तरीय पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे.

तरी जिल्ह्यातील प्रलंबित सेवानिवृत्ती प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचाऱ्यांनी या पेन्शन अदालतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी केले आहे.

## न्यायप्रविष्ट प्रकरणात सरकारचा हस्तक्षेप गंभीर विषय, थातूरमातूर उत्तर नको : उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । नागपूर**

राज्याचे मुख्यमंत्री आणि नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप करत नागपूर न्यास जमीन विक्री प्रकरणावरुन आज विरोधकांनी विधान परिषेदत शिंदेंच्या राजीनाम्याची मागणी केली. नागपूर न्यास प्रकरणावरुन विरोधकांनी मुख्यमंत्र्यांना घेरण्याचा प्रयत्न केला. याच मुद्द्यावरुन उद्धव ठाकरे यांनीही शिंदे सरकारला धारेवर धरलं आहे. नागपूर न्यास जमीन विक्री प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाही सरकारकडून हस्तक्षेप केला गेला असं कोर्टाच्या अमायकस क्युरीनंच (न्यायालयाचे मित्र) म्हटलं आहे. न्यायप्रविष्ट प्रकरणामध्ये मंत्र्यानं हस्तक्षेप करणं हे प्रकरण अतिशय गंभीर आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

नागपूर न्यास जमीन विक्री प्रकरणाची फडणवीसांनी ज्या सहजतेनं लिलया कथानक सभागृहात सांगितलं त्यानुसार जर विषय इतका सोपा होता तर तो इतके वर्ष का चालला? अमायकर क्युरी जर म्हणत असेल की सरकारचा हस्तक्षेप झाला होता तर मग याचा अर्थ काय? नुसतं ही एक केस म्हणून याकडे पाहणं चुकीचं आहे. विषय न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये सरकारकडून केल्या गेलेल्या हस्तक्षेपाचा आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

नागपूर न्यास जमीन विक्री प्रकरणासंबंधीचा निर्णय महाविकास आघाडी सरकारच्या काळात घेण्यात आला होता याबाबत बोलत असताना उद्धव ठाकरे यांनी स्पष्टीकरण दिलं. मी त्यावेळी मुख्यमंत्री असलो तरी घेण्यात आलेला निर्णय नगरविकास खात्याअंतर्गत तत्कालीन मंत्र्यांनी घेतला होता. नगरविकास खात्याच्या अखत्यारित



तो निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळीचे नगरविकास मंत्री आताही त्याच खात्याचे मंत्री आणि मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे त्यांनी उत्तर देणं गरजेचं आहे. नुसतं थातूरमातूर उत्तर देऊन चालणार नाही. न्यायप्रविष्ट प्रकरणात तुम्ही हस्तक्षेप केलात हा मुद्दा आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

## स्थानिक मच्छिमारांना विचारात न घेता रो रो जेट्टीचे काम सुरु

### मोरा कोळीवाडा स्थानिक मच्छिमारांच्या न्याय हक्कासाठी बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

मोरा बंदर, मोरा कोळीवाडा, तालुका उरण, जिल्हा रायगड येथील स्थानिक मच्छिमारांना विचारात न घेता रो रो जेट्टीचे काम सुरु आहे. याबाबत २०१३ च्या नव्या भू संपादित कायद्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी रायगड यांच्यामार्फत सोशल इम्पॅक्ट रिपोर्ट करून पुनर्वसन, पुर्नस्थापना करण्याच्या अनुषंगाने व कोळी समाज बांधवाना त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्याच्या उद्देशाने व कोळी बांधवांचे विविध मागण्या प्रलंबित असल्यामुळे ओबीसी नेते राजाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोरा कोळीवाडा ग्रामविकास समितीच्या माध्यमातून मोरा कोळीवाडा येथील आई एकविरा मंदिर येथे एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध ठराव व निर्णय घेण्यात आले.

मोरा कोळीवाडा ग्रामविकास समितीच्या माध्यमातून मोरा कोळीवाडा येथील आई एकविरा मंदिर येथे कोळी बांधवांच्या न्याय हक्कासाठी व त्यांचे अधिकार, त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी तसेच कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी ओबीसी नेते राजाराम पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी मार्गदर्शन करताना राजाराम पाटील म्हणाले की आगरी कोळी, कराडी, भंडारी, आदिवासी हे येथील जमिनीचे खरे मालक आहेत. मात्र विविध प्रकल्प, विकास कामांच्या माध्यमातून या सर्वांचे अस्तित्व नष्ट करण्याचा प्रयत्न शासनाकडून सुरु आहे. रो रो जेट्टीचे काम २०१३ च्या कायद्यातील तरतुदी धाब्यावर बसवून सदरील काम सुरु आहे.



यामुळे बंदरातील २०० ते ३०० नौका आणि त्यावर उपजीविका करणारे ४००० स्त्री व पुरुष हे सर्व मत्स्य व्यावसायिक सदर रो रो जेट्टीमुळे प्रकल्पबाधित होणार आहेत. ज्या भागात प्रत्यक्ष मासेमारी होती त्या भागात नौका नांगरणे, शाकारणे, मासे सुकविणे, जाळी सुकविणे, डागडुजी करणे हि कामे चालतात.या सर्व कामावर गदा येण्याची शक्यता आहे.रो रो जेट्टीकडे जाणाऱ्या रस्त्यामुळे काही राहती घरे बाधित होण्याचा धोका संभवतो.

त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन संघटित व्हा. आपल्या न्याय हक्कासाठी आपला अधिकार वाचविण्यासाठी व समुद्र किनारी असलेले राहती घरे वाचविण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन न्यायालयीन लढा द्या. तरच आपले हक्क व अधिकार सुरक्षित राह–तील. अन्यथा सर्वांवर बेघर होण्याची वेळ येईल असे राजाराम पाटील यांनी सांगितले. यावेळी उपस्थित सर्वांनी आम्ही न्यायालयीन लढा लढू, आम्ही सर्व एकत्र येऊ असा निर्धार ग्रामस्थांनी यावेळी केला. यावेळी जमीन आमच्या हक्काची नाही कोणाच्या बापाची, कोण म्हणतंय देणार नाही घेतल्याशिवाय राहणार नाही अशा घोषणा देण्यात आल्या.

या प्रसंगी मोरा कोळीवाडा ग्रामविकास समितीचे अध्यक्ष प्रशांत कोळी, उपाध्यक्ष हेमंत कोळी, सचिव सुहास कोळी, सहसचिव सुनिल कोळी, खजिनदार शेखर कोळी, सहखजिनदार नंददीप कोळी, रविंद्र चव्हाण व इतर सदस्य उपस्थित होते.सदर विविध ठरावांना हेमंत कोळी यांनी सूचक म्हणून तर प्रशांत कोळी यांनी अनुमोदन दिले. यावेळी सर्वच ग्रामस्थांनी, कोळी बांधवांनी घेतलेल्या निर्णयांना, ठरावांना एकमुखी पाठिंबा दिला.

# मैदानी मैफलीची सांगता

'या सम हा...' हे वाक्य गुळगुळीत वाटले तरी कतारमधील वर्ल्ड कपसाठी तेच योग्य ठरते. प्रथमच वर्ल्ड कप आखाती देशात झाला. तोही प्रथमच नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये. प्रथमच स्पर्धा एकाच महानगराच्या आसपास झाली. संपूर्ण महानगरात फुटबॉलचा उत्सव होता. अवघ्या ३५ मैल परिसरात सर्व स्टेडियम्स होती. जेमतेम २९ लाख लोकसंख्येचा कतार हा चिमुकला देश लाखो चाहत्यांना कसा सामावणार, हा प्रश्नही होता; पण प्रत्यक्ष स्पर्धा सुरू झाल्यावर कोणताही गोंधळ झाला नाही. कमी अंतरावर स्टेडियम असल्यामुळे इतिहासात प्रथमच चाहत्यांना एका दिवशी दोन सामने पाहणे शक्य झाले. एकाच महानगराने सर्व जगातील चाहत्यांचे यजमानपद एकाचवेळी भूषवले. आणि हो, लिओनल मेस्सीने प्रथमच वर्ल्ड कप जिंकला. वर्ल्ड कप फुटबॉलची वेगळीच शान आहे. ही स्पर्धा फिफा, अर्थात जागतिक फुटबॉल महासंघाला साडेसात अब्ज डॉलरचे उत्पन्न देते. विजेत्यांना ४ कोटी २० लाख डॉलर मिळतात तर उपविजेत्यांना ३ कोटी. साखळीत बाद होणाऱ्या संघाचीही कमाई ९० लाख असते. एकूण बक्षिसांची रक्कम ४४ कोटी डॉलर असते. अर्थात, म्हणून ही स्पर्धा मोठी होत नाही. या स्पर्धेतील विजेत्यांची शान वाढते, ती या स्पर्धेसाठी होणाऱ्या पूर्वतयारीमुळे. जवळपास दोनशे संघांना हा वर्ल्ड कप भुरळ घालतो. या स्पर्धेच्या संयोजनात अनेक वर्षे जातात. दोन वर्षे पात्रता स्पर्धा होते. त्यातून माजी विजेत्या इटलीसारखे संघही बाद होतात. त्यानंतर काही महिने स्पर्धेच्या पूर्वतयारीची व्यूहरचना. त्यानंतर त्याची प्रत्यक्ष स्पर्धेतील अंमलबजावणी. प्रत्येक फुटबॉलपटूस हा वर्ल्ड कप मोहिनी घालतो. एखाद्या फुटबॉलपटूचे महत्त्व सांगताना त्याची वर्ल्ड कप स्पर्धेतील कामगिरी सांगितली जाते. लिओनल मेस्सी ३५ वर्षांचा आहे. तो व्यावसायिक फुटबॉल दोन दशके खेळत आहे. सर्वोत्तम फुटबॉलपटूचे पारितोषिक त्याने जिंकले आहे. मात्र, तो पेले, मॅराडोना यांच्याइतकाच महान फुटबॉलपटू असल्याचे रविवारी जगाने स्वीकारले; एवढे या वर्ल्ड कपचे महत्त्व आहे. थॉमस मुल्लर, लुईस सुआरेझ, नेमार, ख्रिस्तियानो रोनाल्डो, हॅरी केन हे स्टार एकापाठोपाठ बाद होत होते. सुआरेझ मैदान सोडताना चेहरा लपवत होता. रोनाल्डो अश्रू ढाळत होता. हॅरी केनला सहकारी कॅमेऱ्याच्या फ्लॅशपासून वाचवत होते. वर्ल्ड कपमध्ये भावना, लौकिक, झळाळी याला काहीही अर्थ नसतो. या स्पर्धेत मेस्सीला गुडघे टेकण्यास सौदी अरेबिया भाग पाडतो, तर तब्बल चारवेळा विजेते झालेल्या जर्मनीला जपानचे फुटबॉल माहात्म्य मान्य करावे लागते. १९७० मधील कार्लोस अल्बर्टोचा गोल, १९८६ मधील मॅराडोनाचा हँड ऑफ गॉड, यंदा सगळा संघ विजयी गोल करणाऱ्याचे कौतुक करीत असताना मेस्सीने प्रतिस्पर्ध्यांचे गोल रोखणाऱ्या मार्टिनेझचे कौतुक करण्यासाठी घेतलेली धाव असे सारे प्रसंग स्पर्धा संस्मरणीय करीत असतात. रविवारी अर्जेंटिनाने सामना जिंकला असे सारे गृहीत धरत असताना फ्रान्सने केलेला प्रतिकार विलक्षण होता. त्यानंतरही अर्जेंटिनाने पुन्हा शर्थीचे प्रयत्न केले. आपण जिंकलोच असे वाटत असताना स्वीकारावी लागणारी बरोबरी, त्यानंतरची अर्जेंटिनाची विजयाची भूक हे रोमांच उभे करणारे होते. प्रत्यक्ष स्पर्धेपूर्वी कतारमधील मद्यबंदी, तिथला समलैंगिक विवाहास असणारा विरोध, स्थलांतरीत कामगारांचे प्रश्न हे सर्व चर्चेत येत होते. वाद झडत होते. वर्ल्ड कपच्या निमित्ताने ही चर्चा जगभर गेली. पण वाढती चुरस, वाढता संघर्ष, वाढते अनपेक्षित निकाल यामुळे वर्ल्ड कप हा अखेर केवळ फुटबॉलचा उत्सव झाला. बाकी विषय मागे पडले. कतार आणि सारे जग केवळ फुटबॉलमय झाले. गटसाखळीत कमालीची चुरस झाल्याने फिफाला ३२ वरून ४८ संघांची स्पर्धा करताना चार संघांची गटसाखळी ठेवून स्पर्धा घेण्याचा विचार करणे भाग पाडले, हे महत्त्वाचे. या वर्ल्ड कपमुळे भारतास पुन्हा एकदा फुटबॉल ज्वर चढला. हे फुटबॉल प्रेम दिवाणखान्यातून मैदानात कसे जाईल, याचा विचार झाल्यास ते फायद्याचे ठरेल. जातिवंत कलेत जसे सर्व भेद, सर्व भिंती, सर्व कुंपणे उल्लंघून जाण्याची क्षमता असते, तशीच क्षमता खेळातही असते. याचे प्रत्यंतर पुन्हा एकदा आले. आपण स्पर्धेत नसलो तरी प्रत्येक सामना भारतीय क्रीडारसिकांनी तन्मयतेने अनुभवला. शेवटच्या सामन्याला श्रीमंत युरोपीय देश आणि तुलनेने गरीब दक्षिण अमेरिकी देश यांच्या लढतीचीही किनार होती. फुटबॉलचे हे सळसळते मैदानी विश्व आज ना उद्या भारतातही यावे आणि इथल्या पुढच्या पिढीलाही पात्रता फेरीत पोहोचण्याचे स्वप्न पडावे, असेच कोणत्याही क्रीडारसिकाला वाटेल. मैदानात रंगलेल्या अविस्मरणीय मैफलीची आता सुफळ सांगता झाली आहे. या रंगतदार अतिद्रुत लयीतील मैफलीच्या आणि तिच्यावर अमीट छाप टाकणाऱ्या लिओनल मेस्सीच्या आठवणींनी फुटबॉलचे विश्व पिढ्यानपिढ्या समृद्ध होत राहणार आहे.

# माकडांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी तळा प्रेस क्लबचा पुढाकार

## उप वनसंरक्षक अधिकारी यांना निवेदन सादर

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यात माकडांनी अक्षरशः उच्छाद मांडला आहे.त्यामुळे नागरिक प्रचंड हैराण झाले असून, या माकडांचा कायम स्वरुपी बंदोबस्त करण्याची मागणी तालुक्याच्या वतीने रायगड प्रेस सलंग्न तळा प्रेस क्लबने पुढाकार घेऊन उपवन संरक्षक अधिकारी रोहा यांना निवेदन सादर केले आहे.या गंभीर समस्ये बाबत वारंवार वृत्तपत्राचे माध्यमातून वन विभागाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला गेला असून प्रशासन निद्रीस्त अवस्थेत असल्याचे निदर्शनात असल्याचे समोर आलै आहे.



शहरात मोठ्या प्रमाणावर माकडांनी उच्छादमांडलाअसून भाजीपाला, वाळत घातलेली धान्य, भातशेती, फूल झाडे, सुकत घातलेले कपडे, यांची यांची वाट लावून टाकतात. शहरातीलबाजारपेठ, मधलीआळी, कासार आळी, सोनार आळी, जोगवाडी कुंभारआळी, पुसाटीवाडी, ब्राह्मण आळी रोहिदास आळी अशा सर्वच गजबजलेल्या भागात माकडे रोज वाड्या वस्तीवर धुमाकूळ घालत आहेत. माकडे छतावर उड्या मारून घराचे पत्रे व कौले फोडतात. ड्रेनेजचे पाईप, विजेच्या तारा,गच्चीत ठेवलेलेसामान, पाण्याच्या टाक्या,झाडाच्या कुंड्या, झाडे यांचे अतोनात नुकसान करत आहेत. त्यांच्या या उपद्रवामुळे झाडे, फळे,फुले यांचे नुकसान होत आहे. घराबाहेर कोणत्याही गोष्टींचे वाळवण घालतायेतनाही. इतकेच नव्हे तर घराची दारे, खिडक्या उघड्या ठेवणेही अवघड झाले आहे घरात शिरुन माकडे अन्नधान्य, भाजीपाला यांचीनासाडी करत आहेत. वाळत घातलेले कपडे देखील फाडून टाकतात. यामुळे मोठी आर्थिक हानी होत आहे. अनेकदा ही माकडे वाहनांवर उड्या मारतात, तर कधी टेरेसच्या पत्र्यावर धुडगूस घाल-तात. या विषयाकडे वन विभाग हात वर करत असल्याचे चित्र सध्या शहरासह ग्रामीण भागात दिसत आहे. शेतकऱ्यांनी यामुळे शेती, भाजी पाला,फळफळावळ, कडधान्य पिके घेण्याकडे दुर्लक्ष केले आहे. डोंगराळ तालूका असून शेती एकमेव पीक घेतअसताना यांचा मोठ्या प्रमाणावर उच्छाद होत असल्याने त्रासले आहेत तरी याबाबत स्थानिक पातळीवर देखील मागणी करण्यात आली होती परंतु यांकडे वन विभाग व स्थानिक प्रशासना कडून जाणून बुजून दुर्लक्ष करण्यात येतआहे. या माकड व वानरांचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांच्या स्वाक्षरीसह विश्वजीत जाधव सहा.उप वनसंरक्षक अधिकारी यांना दिलेल्या निवेदनाने वन विभागाला जाग येणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कामोठे वसाहतीसाठी सिडकोने नवीन पाण्याची उभारण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संपूर्ण कामोठे वसाहतीमध्ये अजूनही अनियमित व अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने वाढती वसाहत व लोकसंख्या लक्षात घेऊन या ठिकाणी नव्याने पाण्याची टाकी उभारावी अशी मागणी शिवसेना (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांनी सिडकोचे मुख्य अभियंता यांच्याकडे केली आहे.

या संदर्भात शिवसेना उपशहर प्रमुख सचिन त्रिमुखे यांनी शहर प्रमुख राकेश गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको मुख्य कार्यकारी अभियंता चोथानी व प्रशांत चेहरे यांची भेट घेतली यावेळी शिवसेना विभाग प्रमुख बबन गोगावले, शिवसेना विभाग संघटक संजय जंगम, शिवसेना पनवेल विधान सभा संघटिका रेवती ताई सपकाळ, शिवसेना पनवेल उप तालुका संघटिका मीनाताई सदरे, शिवसेना कामोठे शहर संघटिकासंगीता राऊत, उपशहर संघटिका सुरेखा जाधव यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना शिवसेना उपशहर प्रमुख सचिन त्रिमुखे यांनी सांगितले की, गेल्या ५ महिन्यांपासून संपूर्ण कामोठे शहरात अनियमित आणि कमी पाणी पुरवठा होत असून सेक्टर १६, १७, १८, ३४, ३५ आणि ३६ मध्ये तर सलग दोन दोन दिवस पाणी येत नसून नागरिक खूप त्रस्त आहेत. अजून पण सोसायटी मध्ये नियमित पाणी येत नाही आणि खूप कमी प्रमाणात पाणी येत आहे आणि दिवसातून फक्त १ ते २ तास पाणी येत आहेत रोज आमच्या कडे तक्रारी येत असून रोज टँकर चे पाणी विकत घेण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. कामोठे मध्ये पाणीचा प्रश्न सुटण्यासाठी सिडकोची कामोठे मध्ये एकच पाण्याची टाकी आहे त्यामुळे कधी पाण्याच्या टाकीचे काहीही काम निघाले कि पाणी एक ते दोन दिवस कामोठे मध्ये पाणी येत नाही आणि कामोठे पहिले लोकसंख्या खूप कमी होती आता तीच लोकसंख्या दुपटं झाली आहे ती त्यामुळे नागरिकांना खूप त्रास होतो म्हणून विनंती आहे कि कामोठे मध्ये अजून एक नवीन पाण्याची टाकी उभारावी तसेच पाणी सोडायची वेळ सकाळी आणि संध्याकाळी एकच ठेवावी त्यामुळे प्रत्येक सोसायटी ला कळेल कि आणि किती वाजता चालू करायचे. तरी लवकरात लवकर या निवेदनाची दखल घेऊन कारवाही कारवाई अन्यथा रायगड भवन बेलापूर विभाग कक्ष जवळ २९/१२/२०२२ या रोजी आमरण उपोषण आणि अंदोलनाच्या करण्यात येईल असा इशारा सुद्धा देण्यात आला आहे.

# महात्मा फुले महाविद्यालयास राज्यस्तरीय महिला कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये पद्मविभूषण खासदार शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व,निबंध व महिला कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात महात्मा फुले महाविद्यालयास राज्यस्तरीय महिला कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद मिळाले

१० डिसेंबर रोजी राज्यस्तरीय महिला कबड्डी स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये महात्मा फुले कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या महिला कबड्डी संघाने अत्यंत चुरशीच्या अंतिम सामन्यात उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन करीत भांडुपच्या आर.ए. डी.ए.व्हि. महाविद्यालयाचा पराभव करीत प्रथम क्रमांक प्राप्त केला. या स्पर्ध्ये मध्ये भांडूप च्या संघास द्रितिय तर एफ बी. नाईक महाविद्यालय कोपरखैरणे यास तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

महाविद्यालायचे प्राचार्य डॉ गणेश ठाकूर यांनी सर्व विजेत्या संघाचे कौतुक व अभिनंदन केले. या कबड्डी सामन्यासाठी रामशेठ ठाकूर व अलका धुरी यांनी या सामन्यास धावती भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धे चे उद्घाटन परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. अत्यंत दिमाखदार पद्धतीने पार पडलेल्या सोहळ्यास शिवछत्रपती पुरस्कार विजेते सुर्यकांत ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागाचे इन्स्पेक्टर रोहिदास ठाकूर ,डॉ अनघा चव्हाण, पंच म्हणून विश्वनाथ पाटील, भालचंद्र पाटील, रजत ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. या राज्यस्तरीय् कबड्डी स्पर्धेसाठी एकूण १६ संघ सहभागी झाले. उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी केले. त्यांच्या प्रास्ताविकपर भाषणामध्ये त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक करीत महाविद्यालयाची उत्तरोत्तर होणारी प्रगती याचा आढावा घेतला. परेश ठाकूर यांनी शरदचंद्र पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व पवार यानी महाराष्ट्राबरोबरच देशासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा उहापोह केला. तसेच क्रीडाविषयक बोलताना परेश ठाकूर यांनी खेळाचे महत्व पटवून देत खेळामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाबरोबर त्याचे मन आणि मनगट बळकट करण्यासाठी खेळाचा उपयोग होतो असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील यांनी केले दिवसभर चाललेल्या या स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण गायकर, डॉ प्रफुल्ल वशेनिकार व प्रा. शरयू नाईक यांनी केले.

# मटण विक्रेत्याला जबर मारहाण, तिघांविरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । रोहा**

मटणाच्या दुकानात येणाऱ्या गिऱ्हाईकांना थांबवून आरोपी स्वतःच्या दुकानातून मटण घेण्यास सांगत असल्याने आरोपी व्यक्तीस जाब विचारले असता आरोपी व्यक्ती व त्यांच्या दोन मुलांनी आपल्याच नात्यातील फिर्यादी मटण विक्रेत्याला जबर मारहाण केल्याची घटना रोहा नगर पालिकेच्या मटण मार्केट मध्ये घडली. या बाबत रोहा पोलीस ठाण्यात तिन्ही आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून पोलिसांनी त्यांना अटक केली आहे.

येथील मटण विकर्ते अ. रज्जाक अलिसाहेब तुळवे यांचा नगर पालिकेच्या मटण मार्केट मध्ये मटण विक्रीचे दुकान आहे. अ. रज्जाक तुळवे यांच्या दुकानात येणाऱ्या गिर्हाईकांना थांबवून त्यांना जबरदस्तीने त्यांच्याकडे मटण घेण्यास सांगत असल्याने त्या बाबत फिर्यादी अ. रज्जाक तुळवे यांनी आरोपी चुलत भाऊ रफिक इस्माईल तुळवे यांस विचारणा केली असता या गोष्टीचा मनात राग येऊन आरोपी रफिक तुळवे, इस्माईल रफिक तुळवे व इर्शाद रफिक तुळवे यांनी संगणमत करून अ. रज्जाक तुळवे यांना नख्यांनी ओरबाडून तसेच हाताबुक्याने काठीने मारहाण केली. अ. रज्जाक यांच्या दुकानातील कामगाराला शिवीगाळी करून हात पाय तोडून टाकू नाहीतर ठार मारू अशी धमकी दिली. या मारहाणीत अ. रज्जाक तुळवे गंभीर जखमी झाल्याने त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिन्ही आरोपिं विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# शाळेच्या बाहेरील परिसरात लागलेला वणवा विझविण्यात यश

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

शाळेच्या बाहेरील परिसरात लागलेला वणवा विझविण्यात यश आल्याने मोठा अनर्थ टळला असल्र्याची घटना समोर आली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार सुशीलाताई पवार माध्य. विद्यालय भाले-पहूर या विद्यालयाचे परिसरात अज्ञाताने लावल्याने व लावलेला वणव्याचा सुरुवातीचा पेटण्राचा वेग हा मंद गतीने होता.परंतू कालांतराने वणव्याची व्याप्ती वाढू लागताच व संभाव्य धोक्याची परिस्थिती लक्षात येताच येथील उपस्थित मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवर्गासह विद्यार्थी वर्गाने

प्रसंगावधान राखून मोठ्या शिताफीने वणवा विझविण्यास प्रारंभ केल्याने वणवा विझविण्यात येथील शिक्षक -विद्यार्थी यांना यश आल्याने मोठाच अनर्थ टळला असल्र्याचे बोलले जात आहे. दरम्यान शिक्षकवर्ग व विद्यार्थी वर्गाने संकटसमयी धैर्य बाळगून वणवा विझविण्याची मोठी कामगिरी केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे

# मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून मोबाईलची चोरी झाल्याची घटना पनवेल रेल्वे स्टेशन माल धक्का रोड येथे घडली आहे.

अंजलीदेवी पालकर (वय ८२) यांच्या राहत्या घरातून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून ५ हजार रुपये किंमतीचा रेडमीएमआय कंपनीचा मोबाईल फोन चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने आपणास असे कळविण्यात येत आहे की, मे.नवजीवन को.ऑप.हौ.सोसायटी लिमिटेड सर्व्हे नं.४७ क, युगांतक कॉम्प्लेक्स, सेंट मेरी स्कूल जवळ, पाली देवद सुकापूर, नवीन पनवेल (RGO/PWL/HGC(TC)1600/2020 Date-11/08/2000) मध्ये बिल्डींग नं.L-2, बिल्डींग नं.L-3, बिल्डींग नं.L-4, अशा तीन निवासी इमारती असून त्यामधील बिल्डींग नं.L-4 ही इमारत अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याने त्याबाबत दि.१६/१२/०२२ रोजी स्टॅक्चर ऑडीट पूर्ण झालेले आहे. सदर स्टॅक्चर ऑडीट नुसार इमारती इमारती ह्या राहण्यास धोकादायक असल्याने व बिल्डींग नं.४ मधील काही भाग दि.११/१२/२०२२ रोजी पडून दुर्घटना झालेली असल्याने बिल्डींग नं.४ ही पाडण्याचा निर्णय सदर सोसायटीच्या पदाधिकारी यांनी घेतलेला आहे. सदर बिल्डींग नं.४ मध्ये अन्य कोणतेही त्रयस्थ किंवा हितसंबंधितांचा काही हक्क व अधिकार असल्यास त्याबाबत योग्य ती कागदपत्रे, पुरावे लेखी तक्रार ही खालील नमूद केलेल्या व्यक्तीस सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत देणेचे आहेत. त्यानंतर आलेल्या हरकती व तक्रारी स्वीकारल्या जाणार नाहीत.

ठिकाण : पालीदेवद (पनवेल)
दि.२०/१२/२०२२

सही/-
**मे.नवजीवन को.हौ.सो.पालीदेवद**
**खजिनदार श्री.संतोष साहेबराव कोळी**

संपर्क

| | | |
|---|---|---|
| १) श्री.संतोष साहेबराव कोळी | खजिनदार | ८७७९६०९४९९ |
| २) श्री.जितेंद्र सोळंखी | सदस्य | ९३२२८३६७४५ |
| ३) श्री.सजीव जोश | सचिव | ९५०३०५३७०८ |

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client has agreed to purchase/acquire from MR. NARAYAN RAMDAS THAKUR all rights, title, interests and benefits in Piece and Parcel of Land bearing Survey/Gat No. 45, Hissa No. 4, Area H.R. admeasuring Hector – Area – Point 0 – 05 – 30 assessed at Rs. 0.11 Ps., Situated lying & being at Village - Juhi, Uran, Taluka - Uran, District – Raigad.

Any person/s having any claim against or to the said property/entitlements there under, by way of sale, mortgage, charge, gift, lease, trust, possession, inheritance, lien, development, maintenance, easement, attachment or otherwise howsoever is hereby required to make the same known to the undersigned at his office address given herein below, along with certified copy of documents pertaining to the claim, within 15 days from the date of publication hereof, otherwise the sale/deal will be completed without reference to such claims and the same, if any will be considered as waived or abandoned.

**SCHEDULE OF PROPERTY**

Survey/Gat No. 45, Hissa No. 4, Area H.R. admeasuring Hector – Area – Point 0 – 05 – 30 assessed at Rs. 0.11 Ps., Situated lying & being at Village - Juhi, Uran, Taluka - Uran, District – Raigad.

Sd/-
**BASHEER A.M SAYYED**
Advocate High Court.
Office No. S-7-67, 2ND Floor, Hawre Centurion Mall, Plot No. 88-91, Sector 19, Nerul, Navi Mumbai – 400706
Mobile:- 9819829297
Email :- advbasheersayyed@gmail.com

## PUBLIC NOTICE

BEFORE THE HON'BLE CIVIL JUDGE (JUNIOR DIVISION) AT PANVEL
MISCELLANEOUS CIVIL APPLICATION NO.1434 OF 2021
Exh No.10/D
Next Date : 10/1/2023

Application for Issue of Succession Certificate in Respect of Financial Securities of Shri. Kashinath Rajaram Sontakke Deceased
Sunil Kashinath Sontakke Applicant

The Public is hereby informed that the Applicant in the above Miscellaneous Application before the Hon'ble Civil Judge (JD) at Panvel is a Class 1 Legal Heir of the late Shri Kashinath Rajaram Sontakke, who was residing at the time of his death at Paras Plaza-401, Ram Ganesh Gadkri Marg, Opposite Prant Office, Panvel, Raigad-410206, and who expired on 05 the day of July 2021.

The Applicant has filed the above Application before the Hon'ble Civil Judge (JD) at Panvel in respect of the Bank Fixed Deposit of the Deceased, copy of which is provided in the Application filed by the Applicant before the Hon'ble Court.

The Public is hereby informed that any person who has any objection to the grant of the above Application is hereby directed to immediately approach the Hon'ble Civil Judge (JD) at Panvel and place his or her objections before the Court within 30 days of the publication of this notice, failing which no objections to the above Application shall be entertained by the Hon'ble Court and the Applicant shall be granted a Succession Certificate in respect of of the Bank Fixed Deposit the late Shri Kashinath Rajaram Sontakke.

The 8 Day of December 2022 at Panvel.

Sd/- Jr.Clerk Panvel Civil Court Senior Division | Court Seal | Sd/- Asst.Superident. Panvel Civil Court Senior Division

मा.मुजावर साहेब कोर्ट
अॅड.सुधीर म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, यांचे कोर्टात
दिवाणी रेग्युलर दावा क्र.३६०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०१/२०२३

श्री.संतोष शिवाजी गुंगे
रा.रचना सोसायटी, प्लॉट नं.एफ-७८,
रुम नं.२१, शिव मंदिराजवळ, सेक्टर नं.१२,
खारघर, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री.शिवाजी रामचंद्र गुंगे हे दि.०७/१२/२०१४ रोजी पासून रचना सोसायटी, प्लॉट नं.एफ-७८, रुम नं.२१, शिव मंदिराजवळ, सेक्टर नं.१२, खारघर, जि.रायगड येथून बेपत्ता आहेत. त्याबाबत खारघर पोलीस स्टेशन येथे दि.०७/१२/२०१४ रोजी तक्रार क्र.६१/२०१४ हा नोंदविला होता. परंतु आजतागायत सदरहू बेपत्ता व्यक्ती श्री.शिवाजी रामचंद्र गुंगे हे त्यांचे घरी आलेली नाही त्याअर्थी अर्जदार श्री.संतोष शिवाजी गुंगे यांनी वडील श्री.शिवाजी रामचंद्र गुंगे यांचा मृत घोषित करणेबाबत दावा मा.कोर्टात दाखल केला आहे.

वरील अर्जदार श्री.संतोष शिवाजी गुंगे यांनी त्यांचे वडील श्री.शिवाजी रामचंद्र गुंगे यांचा मृत घोषित करणेबाबत कोणाचे हरकत कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे मृत घोषित करणेच्या दाव्याबाबत पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर श्री.शिवाजी रामचंद्र गुंगे यांच्या मृत घोषित करण्याचा दावा / अर्ज मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.२०/१२/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# रोह्यात ५ पैकी ५ ग्रामपंचायतींवर राष्ट्रवादी काँग्रेसची निर्विवाद सत्ता

**दै.रायगड नगरी । रोहा**

तालुक्यात झालेल्या ५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विरोधकांना धूळ चारत सर्व ग्रामपंचायतींवर एकहाती सत्ता मिळवली आहे. चुरशीच्या ठरलेल्या पुई ग्रामपंचायत निवडणुकीत वृषाली संजय मांडलूसकर यांनी बाजी मारली, तर तालुक्यात विरोधकांना एकही ग्रामपंचायतीवर आपले वर्चस्व सिद्ध करता आले नाही. शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या मतदारसंघातील दापोली ग्रामपंचायतही राष्ट्रवादीने घेतली असून येथिल ५ ग्रामपंचायतींवर तटकरेंचा करिष्मा दिसून आला.



तालुक्यातील पूई, खैरे खुर्द, पहूर, तळवली तर्फे अष्टमी व दापोली या पाच ग्रामपंचायतीची मंगळवारी तहसीलदार कविता जाधव यांच्या कार्यालयात निवडणुक मतमोजणी प्रक्रिया पार पडली. यात प्रामुख्याने पुई ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध ग्राम विकास आघाडी असा दुरंगी सामना रंगला. चुरशी लढत असे चित्र उभे राहिलेल्या पुई मध्ये राष्ट्रवादीच्या सरपंच पदाच्या उमेदवार वृषाली संजय मांडळुस्कर यांनी आघाडीच्या अस्मिता अनंत सानप यांचा पराभव केला. तर सदस्य पदाच्या एकूण ७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ३ तर ग्राम विकास आघाडीचे ४ सदस्य निवडून आले आहेत. खैरे खुर्द ग्रामपंचायतीत राष्ट्रवादी विरोधात शेकाप – सेना युती तर काही कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन गाव विकास आघाडी असा स्वतंत्र पॅनल उभा केला होता. यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरपंच पदाचे उमेदवार मुजम्मील अहमद गिते हे भरघोस मतांनी विजयी झाले. त्यांनी शेकाप सेना आघाडीचे उमेदवार काशिनाथ भोईर व गाव विकास आघाडीचे अनिल साळवकर यांचा पराभव केला. मात्र सदस्य पदाच्या एकूण ९ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठा फटका बसला. शेकापला ३ व चांडगाव ग्रामविकास आघाडीला ३ राष्ट्रवादी पक्षाला १, शिवसेना ठाकरे गटाला १ तर अन्य एक ठिकाणी अपक्ष उमेदवार निवडून आले.

तळवली तर्फे अष्टमी ग्रामपंचायतीत राष्ट्रवादी शेकाप व भाजपा पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन निवडणुकीच्या सामोरे गेले. तर याच या भागतील काही बंडखोर कार्यकर्त्यांनी वेगळी चूल मांडून राष्ट्रवादी समोर कडवे आव्हान ठेवले होते. मात्र मतदारांनी राष्ट्रवादी व अन्य मित्र पक्षातील उमेदवारांना पसंत केले. यात प्रामुख्याने सरपंच पदाचे राष्ट्रवादी पक्षाचे उमेदवार रवींद्र रामचंद्र मरवडे यांनी आघाडीचे सुधीर नारायण लोखंडे यांचा पराभव केला. तर सदस्य पदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी आघाडीने ७ पैकी ७ जागा मिळवून ग्रामपंचायतीवर एकहाती सत्ता काबीज केली.

पहूर ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या दीपाली दिलीप खांडेकर या विजयी झाल्या आहेत. त्यांनी अश्विनी प्रदीप तांदळेकर(अपक्ष) व शिंदे गटाच्या अमृता रमेश धनावडे यांचा पराभव केला. सदस्य पदाच्या ७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत ७ पैकी ६ जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मिळविल्या तर राजीव शिंदे हे शिंदे गटाचे एकमेव उमेदवार निवडून आले आहेत.

शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या मतदार संघातील दापोली ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या दुरंगी लढतीत शेकापचे उमेदवार अविनाश पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बाळाराम मोरे यांनी पराभव केला. तर सदस्य पदाच्या एकूण ७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी ५ तर शेकपला २ जगावंर समाधान मानावे लागले आहे.

# राहटाड ग्रामपंचयतीमध्ये कमळ फुलले ; राष्ट्रवादी काँग्रेसचा लाजिरवाणा पराभव

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यात एकमेव राहटाड ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचा सुपडा साफ झालाय. गेल्या निवडणुकीत राष्ट्रवादीने काँग्रेसने बिनविरोध सरपंच निवडून आणला होता. मात्र यंदाच्या निवडणुकीत भाजपने कडवे आव्हान उभे केल्यामुळे त्यांना खातेही खोलता आलेले नाहीये. राष्ट्रवादी काँग्रेसने राहटाड ग्रामपंचायत निवडणुकीत भोपळाही फोडलेला नाहीये. त्यामुळे ही निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेससाठी मोठी धक्का देणारीच ठरली आहे. या निवडणुकीत भाजपने थेट सरपंच आणि पाच सदस्य जिंकताना एकहाती सत्ता काबीज केली आहे.तळा तालुक्यात एकमेव राहटाड ग्रामपंचायतीत भारतीय जनता पक्ष आणि शिंदे गट युतीने चमत्कार घडवला असून राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता उलथवून तिथे कमळ फुलविले आहे. तळा जिल्हा परिषद गट आणि राहटाड पंचायत समिती गणात राहटाड ग्रामपंचायत ज्या पक्षाकडे असेल त्या पक्षाचा उमेदवार जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये निवडून जातो त्यामुळे ही ग्रामपंचायत प्रतिष्ठेची मानली जाते संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागलेल्या या ग्रामपंचायतीकडे लागले होते.



भाजपच्या थेट सरपंच पदाच्या उमेदवार करंजे मिताली मंगेश यांनी राष्ट्रवादी काँग्रेस भाटे सोनल सचिन यांचा ७१ मतांनी पराभव केला, प्रभाग क्रमांक २ मध्ये माजी सरपंच पाटील चांगदेव रामा यांनी झिंगे केशव गोविंद यांचा ६१ मतांनी पराभव केला,याच प्रभागात नागे नियती नैमेश यांनी खुटिकर पदुबाई यांचा १०५ मतांनी पराभव केला व मालुसरे रुक्मिणी विठोबा यांनी मुर्तुंगे हेमलता सुरेश यांचा १०४ मतांनी पराभव केला आहे,प्रभाग क्रमांक ३ मध्ये कंबु मंगल मंगेश यांनी बालबा गीता नारायण यांचा केवळ ६ मतांनी पराभव केला.याच प्रभागात चोगले सज्jाद मोहंमद शफी यांनी कंबू विठोबा चांग्या यांचा ८ मतांनी पराभव केला आहे

# कर्जतच्या मतदारांनी दिला संमिश्र कौल

## राष्ट्रवादी काँग्रेस ठाकरे गट, शिंदे गट प्रत्येकी दोन, शेकाप एक

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील मांडवणे, कळंब, उक्रूळ, दहिवली तर्फे वरेडी, वावळोली, कोंदिवडे आणि वेणगाव या सात ग्रामपंचायतीच्या निवडणुकासाठी १८ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात आले होते. आज मतमोजणी झाली. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला दोन, बाळासाहेबांच्या शिवसेनेला दोन, शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) दोन आणि शेतकरी कामगार पक्षाला एक असे थेट सरपंच पदाचे उमेदवार निवडून आले. तालुक्यात मतदारांनी कुणालाच नाराज न करता संमिश्र यश दिले. महाराष्ट्राचा विचार करता महा विकास आघाडी पाच तर शिंदे गटाने दोन ग्रामपंचायती जिंकल्या आहेत.

थेट सरपंच पदाच्या निवडणुकीत वावळोली, वेणगाव आणि दहिवली तर्फे वरेडी या ग्रामपंचायतींकडे सर्वांचे लक्ष लागले होते. वावळोली ग्रामपंचायत ही आमदार महेंद्र थोरवे, वेणगाव ग्रामपंचायत शिवसेनेचे माजी जिल्हा उपप्रमुख भाई गायकर आणि दहिवली तर्फ वरेडी ग्रामपंचायत पंचायत समितीचे माजी सभापती अमर मिसळ यांच्या गावाची ग्रामपंचायत आहे. हे सर्व बाळासाहेबांची शिवसेना म्हणजे शिंदे गटाचे आहेत. शिव-सेनेत फूट पडल्यानंतर पहिल्यांदाच या ग्रामपंचायतींच्या निवडणूका होत असल्याने सर्वांचा निकालाची उत्सुकता होती. मात्र आमदार थोरवे व माजी सभापती अमर मिसाळ यांनी आपल्या ग्रामपंचायती जिंकल्या पण भाई गायकर यांच्या ग्रामपंचायतीत ९ पैकी सात जागा शिंदे गटाने जिंकल्या पण थेट सरपंच पदी मात्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार निवडून आल्या आहेत.

दहीवलि तर्फे वरेडी ग्रुप ग्रामपंचायत मध्ये प्रभाग एक मधील अनुसूचित जमाती जागे वरील निवडणूक लढविणार उमेदवार विष्णू वाघमारे आणि दत्ता वाघमारे यांना समसमान ४४१मते मिळाली. शेवटी चिठ्ठी काढली असता विष्णू वाघमारे हे चिठ्ठीवर निवडून आले.



# सुधागडमध्ये बाळासाहेबांची शिवसेना सरस ; १४ पैकी ५ ग्रामपंचायतींवर फडकविला झेंडा

**दै.रायगड नगरी । पाली**

सुधागड तालुक्यातील १४ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा निकाल मंगळवारी (ता.२०) जाहीर झाला. यामध्ये सर्वाधिक ५ ग्रामपंचायतींवर बाळासाहेबांची शिवसेनेचे सरपंच निवडून आले आहेत. तर उद्धव ठाकरे शिवसेनेने १ खाते उघडले आहे. याबरोबर शेकाप ३, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष १, भाजप १ शेकाप राष्ट्रवादी आघाडी १, शेकाप उद्धव ठाकरे शिवसेना १ आणि शेकाप भाजपा युती १ अशी खाती उघडली आहेत.

तालुक्यातील सिद्धेश्वर, आपटवणे, माणगाव बुद्रुक, चंदरगाव, खांडपोली, हातोंड, चिवे, घोटवडे, ताडगाव, खवली, तिवरे, शिळोशी, अडुळसे, आतोणे या १४ ग्रामपंचायतची निवडणूक झाली आहे. यापैकी चिवे व खांडपोली ग्रामपंचायतवर बाळासाहेबांची शिवसेनेचे सरपंच बिनविरोध निवडून आले आहेत.

सदस्यपदासाठी एकूण ११० जागा होत्या. यापैकी ५० सदस्य बिनविरोध निवड झालेले आहेत.

तर उर्वरित ६० सदस्य पदासाठी निवडणूक झाली. यासाठी १२२ उमेदवार रिंगणात होते. तर १२ ग्रामपंचायतीत सरपंच पदासाठी एकूण २५ उमेदवार रिंगणात होते.

सदस्यपदासाठी वंचित बहुजन आघाडीच्या दोन उमेदवारांनी खाते उघडले आहे. माणगाव बुद्रुक व घोटवडे ग्रामपंचायत सदस्यपदी वंचित बहुजन आघाडीचे प्रत्येक एक उमेदवार निवडून आले आहेत.

या निवडणुकीत शेकापने तब्बल ३ वेगवेगळ्या पक्षांसोबत युती आणि आघाडी केलेली दिसली. पाली तहसील कार्यालयात सकाळी ९ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. सकाळ पासूनच उमेदवार, विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी तहसील कार्यालयाबाहेर गर्दी केली होती. निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांच्या गटात एकच जल्लोष झाला.



# अलिबाग तालुक्यात शेकाप आघाडीचे वर्चस्व

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग तालुक्यात सहा ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत शेतकरी कामगार पक्ष आघाडीने वर्चस्व मिळवले आहे. आक्षी, मुळे आणि वैजाळी ग्रामपंचायतीमध्ये शेतकरी कामगार पक्षाचे सरपंच चांगल्या मताधिक्क्याने निवडून आले आहेत तर या तीन ग्रामपंचायतींसह नारंगी ग्रामपंचायतीत शेकापला बहुमत मिळाले असल्याने सहापैकी चार ग्रामपंचायतीत शेकाप आघाडीचे वर्चस्व सिद्ध झाले आहे.

तालुक्यातील सहा ग्रामपंचायतींच्या निवडणूकांची आज मतमोजणी अलिबाग तहसिलदार कार्यालयात पार पडली. आक्षी ग्रामपंचायतीमध्ये शेकाप काँग्रेस आघाडीच्या उमेदवार रश्मी रविंद्र पाटील यांनी शिवसेनेच्या उमेदवार पुजा महेश गुरव तसेच अपक्ष उमेदवार श्रेया श्रीकांत गुरव यांचा पराभव करीत विजय मिळवला.



रश्मी पाटील यांना ९९१ तर पुजा गुरव यांना ८६६ तसेच श्रेया गुरव यांना ९३ मते मिळाली. मुळे ग्रामपंचायतीमध्ये देखील शेकाप आघाडीने शिंदे गटाला चितपट करीत ग्रामपंचायती आपल्याकडे राखण्यात यश मिळवले आहे. शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या उमेदवार सुहानी संतोष पाटील यांनी शिंदे गटाच्या प्रतिक्षा प्रमोद थळे यांना पराभुत करीत ग्रामपंचायतीवर आघाडीचा झेंडा फडकवला.

वैजाळी ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या लढतीत शेकापक्ष शिवसेना आघाडीने बाजी मारत ग्रामपंचायतीवर वर्चस्व मिळवले आहे. सरपंच पदाच्या उमेदवार शैला रविंद्र पाटील यांनी चौरंगी लढतीत सर्वाधिक ९२४ मते घेत १९५ मतांनी शिंदे गटाच्या उमेदवार प्रशाली विनोद पाटील यांचा पराभव केला.

नारंगी ग्रामपंचायतीमध्ये शेकापचा निसटता पराभव झाला असला तरी सर्वाधिक सदस्य हे शेकापक्षाचे निवडून आल्याने ग्रामपंचायतीवर शेकापक्षाचे वर्चस्व कायम राहिले आहे. तर शिंदे गटाचे थेट सरपंचपदाचे उमेदवार उदय बाबू म्हात्रे हे निवडून आले आहेत. शिरवली ग्रामपंचायतीत थेट सरपंचपदी शिंदे गटाचे प्रनिकेत रमाकांत म्हात्रे हे निवडून आले आहेत.

बोरीस गुंजीस ग्रामपंचायतीमध्ये शिंदे गटाने विजय मिळवला. सदिच्छा सुधीर पाटील यांनी काँग्रेसच्या अर्चना प्रविण म्हात्रे यांचा पराभव केला. अलिबागचे तहसिलदार विशाल दौंडकर आणि निवासी नायब तहसिलदार अजित टोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी शांततेत पार पडली.


**जाहिरात**

**जिल्हा रुग्णालय रायगड अलिबाग**

**सामान्य परिचर्या व प्रसाविका प्रशिक्षण (जी.एन.एम.)**

**(कालावधी तीन वर्ष) प्रशिक्षण प्रवेश**

जिल्हा रुग्णालय रायगड अलिबाग येथे दि.०९/०१/२०२३ पासून सुरू होणाऱ्या दोन वर्ष ए.एन.एम. प्रशिक्षणासाठी फक्त रायगड जिल्ह्यातील महिला व पुरुष उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीनुसार इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) एकूण जागा :- ४० (३६ स्त्री उमेदवार + ४ पुरुष उमेदवार)

उपसंचालक आरोग्य सेवा, शुश्रृषा, आरोग्य भवन, मुंबई, यांच्याकडून प्राप्त झालेले अनुज्ञेय

**अनुशेष / प्रवर्ग**

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला | आर्थिक दुर्बल घटक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | १५ | ४ | ४० |

२) वयोमर्यादा :- दि.३१/०८/२०२२ रोजी उमेदवाराचे वय १७ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त असू नये. (इतर विशेष सवलत नाही.)

३) शैक्षणिक पात्रता :- १) उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाची उच्च माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परिक्षा १२ वी (१०+२) अथवा समतुल्य परिक्षा शासनमान्य संस्थेतून प्राधान्याने फिजीक्स, केमिस्ट्री व बायोलॉजी या शास्त्र विषयांसह कमीत कमी ४० टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. मात्र मागासवर्गीय गटातील उमेदवारांच्या बाबतीत किमान ३५ टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे आवश्यक पात्रता (विज्ञान शाखेची) धारण करणारे उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध न झाल्यास महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाची, कोणत्याही शाखेतील कोणतेही विषय घेवून उच्च माध्यमिक परिक्षा (१०+२) कमीत कमी ४० टक्के उत्तीर्ण करणाऱ्या खुल्या गटातील उमेदवारांचा व कमीत कमी ३५ टक्के गुणांनी उत्तीर्ण करणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांचा प्रवेशासाठी विचार करण्यात येईल.

इंडियन नर्सिंग कॉन्सिलच्या पत्र क्र.एफ.नं.१-५/२०१८ आयएनसी दि.१९/०४/२०१९ च्या परिपत्रकानुसार 'For Disabled Condidates : 5% Disability of locomotor to the tune of 40% to 50% of the lower extremity' या अपंग आरक्षणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

एएनएम प्रशिक्षण उत्तीर्ण उमेदवारांसाठी ५ टक्के जागा राखीव राहतील.

आशा उमेदवारांकरिता २ जागा राखीव.

४) अभ्यासक्रमाचा कालावधी व वसतीगृह सुविधा :- ३ वर्ष (प्रशिक्षण कालावधीत महिला उमेदवारास उपलब्धतेनुसार शासकीय वसतीगृहात राहण्याची सोय मोफत करण्यात येईल. परंतु प्रथमवर्ष प्रवेशित उमेदवारांना त्यांच्या व पालकांच्या संमतीने व जबाबदारीवर अनिवासी प्रशिक्षणाची संमती देण्यात येईल. तसेच पुरुष उमेदवारास राहण्याची व जेवणाची सोय स्वतः करावयाची आहे.)

५) विद्यावेतन :- निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींना शासन नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेले विद्यावेतन दरमहा दिले जाईल.

६) प्रवेश अर्ज व शुल्क :- खुल्या प्रवर्गासाठी रु.५००/- व मागासवर्गीयांसाठी रु.२५०/- असे आहे.

निवड झालेल्या उमदेवारांना भोजन खर्च, पुस्तके, स्टेशनरी, गणवेश इत्यादी खर्च स्वतः करावा लागेल. परिक्षा शुल्क, संलग्नता शुल्क (Enrollment), एसएनए सदस्यता शुल्क, यांचे विहित शुल्क संस्थेत भरणा करावा लागेल.

७) प्रशिक्षणाचे ठिकाण :- परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जिल्हा रुग्णालय रायगड अलिबाग

८) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

९) प्रवेशप्रक्रियेचे वेळापत्रक :-

| अ.क्र. | घटक | कालावधी |
|---|---|---|
| १ | आयुक्तालयाने परिपत्रक निर्गमित करणे | दि.१९/१२/२०२२ |
| २ | जाहिरात देणे | दि.१९/१२/२०२२ ते दि.२२/१२/२०२२ |
| ३ | प्रवेश अर्ज वाटप करणे | दि.१९/१२/२०२२ ते दि.२३/१२/२०२२ |
| ४ | प्रवेश अर्ज स्वीकारणे | दि.१९/१२/२०२२ ते दि.२४/१२/२०२२ |
| ५ | प्रवेश अर्जाची छाननी | दि.२४/१२/२०२२ ते दि.२६/१२/२०२२ |
| ६ | गुणवत्ता यादी व मुलाखत यादी तयार करणे | दि.२७/१२/२०२२ |
| ७ | गुणवत्ता यादी व मुलाखत यादी प्रसिद्ध करणे | दि.२८/१२/२०२२ |
| ८ | समुपदेशन / कागदपत्र तपासणी | दि.२९/१२/२०२२ |
| ९ | राज्यस्तरिय समितीची अंतिम मान्यता देणे | दि.०४/०१/२०२३ |
| १० | निवड यादी प्रसिद्ध करणे व निवड पत्र देणे | दि.०६/०१/२०२३ |
| ११ | उमेदवार प्रशिक्षणासाठी हजर होणे व प्रशिक्षण सुरू होणे | दि.०९/०१/२०२३ |

१०) निवड झालेल्या उमेदवारांना कागद पडताळणी करिता सादर करावयाची मुळ कागदपत्रे :-

शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला. (१२ वी)
१० वी व १२ वी उत्तीर्णतेची गुणपत्रिता व प्रमाणपत्रे
महाविद्यालयाकडून प्राप्त १२ वी पास प्रयत्न प्रमाणपत्र (Attempt Certificate)
जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र
वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र
नॉनक्रिमीलेअर सर्टीफिकेट
विवाहित असल्यास पतीचे संमतीपत्र
आधार कार्ड
शासकीय रुग्णालयातील सक्षम वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र
राखीव गटातील उमेदवारांना त्यांची आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

११) विद्यार्थ्यांचे स्थानांतर :- एका संस्थेत प्रवेश दिल्यानंतर प्रशिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना दुसऱ्या संस्थेत स्थानांतर करता येणार नाही.

१२) शिस्त व वर्तणूक प्रतिज्ञापत्र :- निवड झालेल्या उमेदवारांना प्रवेशाच्या वेळी नियमांचे काटेकोरपणे पालन होईल अशा अर्थाचे प्रतिज्ञापत्राचा नमुना देण्यात येईल त्या नमुन्यानुसार सदर उमेदवाराने रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले प्रतिज्ञापत्र तयार करून परिचर्या प्रशिक्षण विद्यालयात सादर करावे लागेल.

१३) निवड झालेल्या उमेदवारांनी परिचारिका प्रशिक्षण विभाग, जिल्हा रुग्णालय, अलिबाग जि.रायगड येथे कागदपत्र पडताळणीस येताना सर्व मुळ प्रमाणपत्रासह स्वखर्चाने यावे, त्यासाठी कोणताही भत्ता दिला जाणार नाही. यावेळी सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रतीची छाननी करण्यात येईल.

१४) एकदा प्रवेशित झालेली विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणासाठी निवड झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण सोडून गेल्यास रु.५०,०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात येईल.

**सही/-**
**जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड**
**अलिबाग**

क्र.विमाका/कोवि/व.जा./१९९/५०८२/२०२२

# रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचा निकाल

## उरणमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे ८ सरपंच विजयी, भाजपाचे ५, काँग्रेस ३ तर शेकापचे २ सरपंच विजयी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील १७ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा निकाल काल मंगळवारी जाहीर झाला असून, शिवसेना ठाकरे गटाचे ८ सरपंच पद–ाचे उमेदवार निवडून आले आहेत. तर रानसई या आदिवासी बांधवांच्या ग्रामपंचायतीवर भाजपाने एक हाती सत्ता संपादित करुन तालुक्यातील एकूण ५ ग्रामपंचायतीवर भाजपा पक्षाचे सरपंच पदाचे उमेदवार निवडून आणण्यात यश मिळविले आहे.काँग्रस पक्षाचे ३ सरपंच पदाचे उमेदवार निवडून आले असून शेकापला २ सरपंच पदावर समाधान मानावे लागले आहे. सरपंच पदी निवडून आलेल्या सर्वच पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष केला आहे.



उरण तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीच्या निवडणुका या १८ डिसेंबर रोजी पार पडल्या, मात्र यामध्ये घारापुरी ग्रामपंचायतीची निवडणूक ही बिनविरोध झाल्याने या जागतिक किर्तीच्या घारापुरी बेटावरील ग्रामपंचायतीवर या अगोदर शिवसेना ठाकरे गटानी आपला झेंडा फडकावला होता. त्यामुळे उर्वरित जसखार, भेंडखळ, नवघर, पागोटे, करळ, पुनाडे, वशेणी, सारडे, पिरकोन, धुतूम, चिर्ले, बोकडविरा, पाणजे, डोंगरी, नवीनशेवा, रानसई आणि कळंबुसरे या १७ ग्रामपंचायतीच्या निवडणुका या १८ डिसेंबर रोजी पार पडल्या त्यातील १७ ग्रामपंचायतीच्या निकाल हा उरण येथील निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी काल २० डिसेंबर रोजी मतमोजणीच्या दिवशी जाहीर केला आहे.

यामध्ये रानसई ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाजप विरोधात शिवसेना ठाकरे गटांमध्ये सरळ चुरशीची लढत झाली त्यामध्ये भाजपाच्या सरपंच पदाच्या उमेदवार राधा मधुकर पारधी यांना ४९२ मते मिळाली ( विजयी) असून ग्रामपंचायतीचे सहा सदस्य निवडून आणत भाजपाने एक हाती सत्ता संपादित केली आहे. जसखार ग्रामपंचायतीच्या शिवसेना ठाकरे गट– भाजपा आघाडीच्या सरपंच पदाच्या उमेदवार काशिबाई हसुराम ठाकूर यांना ९२८ मते मिळाली ( विजयी) तर पक्ष विरहित युवा गटाच्या सरपंच पदाच्या उमेदवार मंजुळा ठाकूर यांना ८८४ मते मिळाली. नवीनशेवा ग्रामपंचायत शिवसेना ठाकरे गटाच्या सरपंच पदाच्या उमेदवार सोनल निलेश घरत यांना ८८० मते मिळाली (विजयी) मिळाली आहेत.

पाणजे ग्रामपंचायत शिवसेना ठाकरे गटाच्या आघाडीच्या उमेदवार लखपती हसुराम पाटील यांना ४२९ मते मिळाली (विजयी) मिळाली आहेत. पागोटे ग्रामपंचायत मध्ये शिवसेना ठाकरे गट – शेकाप सरपंच पदाचे उमेदवार कुणाल पाटील यांना ६९५ मते मिळाली (विजयी) मिळाली आहेत. कळंबुसरे ग्रामपंचायत मध्ये शिवसेना ठाकरे गट– शेकाप सरपंच पदाच्या उमेदवार उर्मिला निनाद नाईक यांना ९३८ मते मिळाली ( विजयी) मिळाली आहेत. नवघर ग्रामपंचायत मध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या सरपंच पदाच्या उमेदवार सविता नितीन मढवी यांना १०२५ मते मिळाली ( विजयी) मळाली आहेत. भेंडखळ ग्रामपंचायत मध्ये भाजपच्या सरपंच पदाच्या उमेदवार मंजिता मिलिंद पाटील यांना ७९९ मते मिळाली (विजयी) मिळाली आहेत. करळ ग्रामपंचायत मध्ये भाजपच्या सरपंच पदाच्या उमेदवार अनिता अरविंद तांडेल यांना ३५५ मते मिळाली ( विजयी) तर दर्शना नितीन तांडेल यांना ३४४ मते घेऊन पराजित झाल्या आहेत. डोंगरी ग्रामपंचायतीमध्ये भाजपच्या सरपंच पदाचे उमेदवार संकेत दिलीप घरत यांना ५४६ मते मिळाली (विजयी) आहेत.

सारडे ग्रामपंचायत मध्ये भाजपा सरपंच पदाचे उमेदवार रोशन पांडुरंग पाटील यांना ५७९ मते मिळाली (विजयी) मते मिळाली. पुनाडे ग्रामपंचायत मध्ये काँग्रेस आघाडीचे सरपंच पदाचे उमेदवार निलेश अनंत कातकरी यांना ४५८ मते मिळाली (विजयी) मिळाली आहेत. पिरकोन काँग्रेस– भाजपा आघाडीचे सरपंच पदाचे उमेदवार कलावंती काशिनाथ पाटील यांना १३९९ मते मिळाली (विजयी) आहेत. धुतूम ग्रामपंचायत मध्ये काँग्रेस– शिवसेना युतीच्या सरपंच पदाच्या उमेदवार सुचिता प्रेमनाथ ठाकूर यांना ९४० मते मिळाली ( विजयी) आहेत.

चिर्ले ग्रामपंचायतीमध्ये शेकाप सरपंच पदाचे उमेदवार सुधाकर उर्फ काका भाऊ पाटील यांना १३२१ मते मिळाली (विजयी) आहेत. बोकडविरा ग्रामपंचायत मध्ये शेकाप सरपंच पदाच्या उमेदवार अर्पणा मनोज पाटील यांना ८२९ मते मिळाली ( विजयी) आहेत.

## महाड तालुक्यात शिंदे गटाची सरशी

### गोगावले गट -३५, मविआ १५

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड तालुक्यातील ग्रामीण भागात आजही आ. भरत गोगावले याचे वर्चस्व असल्याने ग्रामपंचायत निवडणूक मतमोजणी नंतर अधोरेखित झाले आहे ५३ ग्रामपंचायत मध्ये झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत बाळासाहेब शिंदे गट कडे ३१ पंचायत तर महाविकास आघाडी कडे १५ पंचायत व १ ग्रामविकास आघाडीने सत्ता मिळवली आहे.

पंचायत मतदान प्रक्रिया रविवारी पार पडली. मंगळवारी (दि.२०) मतमोजणी सुरू झाली असून चार फेरीत ५३ ग्रामपंचायतींपैकी ३१ ग्रामपंचायतींवर गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिंदे गटाने निवडणुकीत वर्चस्व मिळविले आहे. गोगावले यांच्या ताब्यात अप्पर तुडील, नांदगाव बु ,पारमाची, रानवडी, सवाने,आदीस्ते, वराठी, वारंगी वाघोली, धामणे, कुसगाव ,शिरवली, लोअर तुडील, बीजघर, घावरेकोंड, पणदेरी, देशमुख कांबळे, तलीये, कारंजाडी, आडी,उंदेरी, करंजखोल, कोळेसे , नाते, वीर,साकडी, कावळे तर्फे विन्हेरे, नडगाव तर्फे बिरवाड, नातोंडी , ताम्हाणे.

महाविकास आघाडीकडे आबवडे, वाळसुरे, सावरट, कोथेरी, लाडवली,वरंध, गोठे, मोहप्रे, गांधारपार्ले, दासगाव,वहूर, कोल, बारसगाव, या तर महाविकास आघाडी च्या पाठींब्या वर भाजप ची सत्ता चिभावे ग्रामपंचायत वर निर्वादीत आली आहे त्याच प्रमाणे गावविकास पातळीवर जुई बु ची सत्ता आली असून या ग्रामपंचायतीमध्ये यापूर्वी काँग्रेस कडे होती.

वरंध ग्रामपंचायत मध्ये महाविकास आघाडी चे वर्चस्व हे गोगावले याच्या प्रतिष्ठेला ठेच लागल्या सारखे आहे तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत मधील निकाल आत्मपरीक्षण करणे क्रमप्राप्त बनले आहे या निकालानंतर गोगावले गटाने जोरदार घोषणाबाजी, गुलाल उधळूण आनंदोत्सव साजरा केला. मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



## श्रीवर्धन तालुक्यात ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व

### १३ पैकी ९ ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादीची सत्ता

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात तेरा ग्रामपंचायत निवडणुकांचा निकाल जाहीर झाला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पहिल्या क्रमांकावर राहिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची तेरा पैकी नऊ ग्रामपंचायतीवर सत्ता आली आहे. श्रीवर्धनमधील सायगाव ग्रामपंचायत सरपंच पदी राष्ट्रवादीच्या स्वाती निगुडकर, जसवली ग्रामपंचात सरपंच पदी बिनविरोध किशोर मांडवकर, वाळवटी ग्रामपंचायत सरपंचपदी राष्ट्रवादीच्या नुहा जावेद ढांगु, शेखाडी सरपंचपदी राष्ट्रवादीचे बबन दामू पाटील, सर्वे ग्रामपंचायत या ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादीची सत्ता आली आहे. तर गुळधे, कुडकी व मेघरे या तीन ग्रामपंचायती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे बिनविरोध झाल्या होत्या. ग्रामपंचायत निवडणुकीत श्रीवर्धन तालुक्यात महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाल्याचं चित्र दिसत असून स्थानिक पातळीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट स्वतंत्र लढत देत होता. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचा वांजळे व साखरोणे या दोन ग्रामपंचायतीवर भगवा फडकला आहे. साखरोणे सरपंचपदी ठाकरे गटाच्या रुचिता राजेंद्र विचारे विजयी झाल्या आहेत, तर वांजळे ग्रामपंचायती मध्ये सरपंच पदी ठाकरे गटाचे आत्माराम गायकर विजयी झाले आहेत.



श्रीवर्धन तालुक्यातील लक्षवेधी ठरलेल्या दिवेआगर ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी पक्षाने आपलं वर्चस्व कायम ठेवलं आहे. दिवेआगरमध्ये राष्ट्रवादी संपवण्यासाठी काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट व शिवसेना शिंदे गट यांनी एकत्र येत मांडी थोपटली होती.

मात्र याठिकाणी शिवसेना, काँग्रेस आघाडीचे उमेदवार विजय तोडणकर यांचा पराभव झाला असून राष्ट्रवादी पक्षाचे युवक तालुकाध्यक्ष सिद्धेश कोसबे सरपंच पदी निवडून आले आहेत. त्याच बरोबर भाजपचे तालुकाध्यक्ष प्रशांत शिंदे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख अविनाश कोळंबेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य दक्षता कोळंबेकर यांच्यात प्रतिष्ठाची ठरलेल्या चिखलप ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपने आपली प्रतिष्ठा पणाला लावत भाजपचे कमळ फुलवलं आहे. चिखलप ग्रामपंचायतमध्ये भाजपचे सरपंच पदाच्या उमेदवार वैशाली विष्णू घडशी यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उमेदवार राजेश्री राजेश करदेकर यांचा पराभव केला आहे.

## मुरुड तालुक्यातील पाच ग्रामपंचायती पैकी चार शिंदे गटाकडे तर एक ठाकरे गटाकडे

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील पाच ग्रामपंचायतींचा निवडणूक निकाल मंगळवारी जाहीर झाला. यामध्ये कोर्लईत शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या राजश्री प्रशांत मिसाळ या विजयी झाल्या.तालुक्यातील पाच ग्रामपंचायती पैकी चार ग्रामपंचायती शिंदे गटाकडे तर एका ग्रामपंचायतींवर ठाकरे गटाने विजय मिळवला.

कोर्लई ग्रामपंचायत निवडणुकीत राजश्री मिसाळ यांना ८२३ मते मिळाली. त्यांनी बाळासाहेबांची शिवसेनेचे सरपंच उमेदवार दिपाली म्हात्रे यांचा १७२ मतांनी पराभव करण्यात आला. या विजयाने आ.महेंद्र दळवी गटाला मोठा धक्का बसला आहे. प्रचाराच्यावेळी कोर्लईतील मतदारांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्याने दळवी यांना माघारी फिरावे लागले होते.

दरम्यान, यावेळी तेलवडे ग्रामपंचायत ग्रामस्थांनी निवडणुकीत बाळासाहेबांची शिवसेना गटाला जाहीर पाठिंबा देऊन ही निवडणूक बिनविरोध करण्यात आली. मंगळवारी तहसीलदार तथा निवडणूक अधिकारी –रोहन शिंदे यांच्या उपस्थित मुरुड तहसीलदार कार्यालया समोरील दरबार हॉलमध्ये मध्ये मतमोजणीला सुरुवात करण्यात आली.प्रथम टपाली मतदानाला मोजणी करण्यात आली.या



मोजणीत कोर्लई ग्रामपंचायत मधील सरपंच पदाकरीता राजश्री मिसाळ यांना ५ मत मिळाली व दिपाली म्हात्रे यांना २ मते मिळाली तर काकळघर सरपंच पदाकरीता मनोहर ठाकुर १ मतदान ग्रामपंचायत सदस्य पदाकरीता मंगेश जोडत, निलम ठाकुर,पुष्पा मेहेतर यांना एक एक मत प्राप्त झालं.

मतदान मोजणीमध्ये वावडुंगी ग्रामपंचायतमधून बाळासाहेबांची शिवसे–नेचे सरपंच उमेदवार– ऋतुजा वरणकर या विजयी झाल्या. वेळास्तेमध्येही बाळासाहेबांची शिवसेनेचे सरपंच उमेदवार शनिता खेडेकर ४५३ विजयी झाल्या. काकळघरमध्ये बाळासाहेबांची शिवसेनेचे उमेदवार स्वस्तिक ठाकूर विजयी झाले.

या पाच ग्रामपंचायत निवडणुकीत बाळासाहेबांची शिवसेना पक्षाला पाच पैकी चार ग्रामपंचायत निवडणुक आणण्यात यश आलं तर १ ग्रामपंचायत उद्धव ठाकरे यांच्या शिव–सेना पक्षाला यश मिळाले. या निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस व कॉग्रेस पक्ष कुठे ही दिसून आले नाही. यावेळी निवडणूक नायब तहसीलदार अमित पुरी, नायब तहसीलदार रविंद्र सानप, गोविंद कोटंबे, प्रसाद माळी, निवडणूक निर्णय अधिकारी साहिल मुजावर, मनोज पुलेकर, राकेश पाटील, प्रकाश आरेकर,सचिन मुनेश्वर, आशिष मुकणे आदिंसह अधिकारी यांनी काम पाहिलं. मतमोजणी केंद्रा बाहेर मुरुड पोलिस ठाण्याचे सर्व पोलीस अधिकारी कर्मचारी यांचा चोख बंदोबस्त तैनात होता.

## माणगांव तालुक्यात शिंदे गटाला मोठा धक्का महाविकास आघाडी यशस्वी



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुक्यातील १६ ग्रामपंचायतींसाठी रविवारी १८ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती. आज मंगळवार २० डिसेंबरला निकाल जाहीर झाला आहे. १६ ग्रामपंचायतीसाठी दोन टप्प्यात मतमोजणी करण्यात आली. पहिल्या टप्यात न्हावे, शिरवली, नांदवी, कुंभे, कुमशेत, दहिवली कोंड, पहेल या ८ ग्रांमपंच्यातींची मतमोजणी पार पडली यामध्ये कूंभे ग्रामपंचायतीमध्ये ग्रामविकास आघाडीचा सरपंच निवडून आला. तर इतर सात ग्रामपंचायतींमध्ये महाविकास आघाडीने विजय मिळविला. शिंदे गटाला पहिल्या टप्प्यात सफशेल अपयश आलेले पाहायला मिळाले.

तर दुसऱ्या टप्प्यातील मतमोजणीत भागाड, मांगरूळ, मुठवली तळे, हरकोल, होडगाव, चिंचवली, साई, गोरेगाव या ८ ग्रामपंचायतींचा निकाल जाहीर करण्यात आला. यामध्ये मांगरूळ ग्रामपंचायतीमध्ये शिंदे गटाला विजय मिळविण्यात यश आले तर इतर सात ग्रामपंचायतींमध्ये महाविकासआघाडीचा विजय झाला आहे. १४ महाविकास आघाडी, १ बाळासाहेबांची शिवसेना, १ ग्रामविकास आघाडी असा एकुण १६ ग्रामपंचायतींचा माणगांव तालुक्यातील निकाल आहे.

या निवडणुकी आधीच ३ जागी बिनविरोध निकाल जाहीर झाला आहे. माणगांव तालूक्यातील हा निकाल शिंदे गटाला मोठा धक्का समजला जात आहे. या ठिकाणी राष्ट्रवादी व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे अर्थात महाविकास आघाडीचे वर्चस्व दिसत असुन तशा प्रतिक्रियाही आघाडीच्या नेत्यांकडुन व्यक्त होत आहेत.

## म्हसळयात राष्ट्रवादीचे वर्चस्व १३ पैकी १० राष्ट्रवादी

### २ शिवसेना उद्धव गट तर एका ठिकाणी गावविकास आघाडी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ७ ग्रामपंचायतीच्या निवडणुका बिनविरोध झाल्या होत्या तर रविवारी ६ ग्रामपंचायतीमध्ये आणि सदस्यांमध्ये निवडणूक झाली होती. त्यामध्ये सर्वात प्रतिष्ठेची मानली जाणारी घोनसे ग्रामपंचायत हि राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत असताना त्यामध्ये रमेश काणसे बहुधीक्य मताने विजयी झाले आहेत. तर तोंडसुरे ग्रामपंचायत मध्ये शिंदे गट विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत झाली असता त्याच्यामध्ये बाळासाहेब ठाकरे पक्षाचा निसटता पराभव झाला आहे. तर त्याठिकाणी राष्ट्रवादी विजयी झाली आहे. तर देवघर ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रवादी पक्षाचा वर्चस्व असलेली ग्रामपंचायत आपल्या गाव विकास आघाडीने घेतली आहे. तर त्याठिकाणी शेकाप पक्षाला अल्प मताने पराभव स्वीकारावा लागला. तर संदेरी तोराडी लेप या ग्रामपंचायतीवर राष्ट्रवादी पक्षाचे सरपंच बहुमताने निवडून आले आहेत. तर बिनविरोध ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रवादी कडे काळसुरी, रेवली, कणघर, फळसप तर कांदळवाडा शिवसेना ठाकरे गटाकडे निगडी, देवघर व खरसई ग्रामविकास आघाडी असल्याने तालुक्यात एकूण राष्ट्रवादीला १० ग्रामपंचायतीमध्ये यश संपादित करता आला आहे.

राजकीय परिस्थिती पाहता तालुक्यात राष्ट्रवादीचा वर्चस्व कायम असला तरी ग्रामविकास आघाडीने राष्ट्रवादीच्या गोठातील देवघर ग्रामपंचायत ग्रामविकास आघाडीने काबीज केली आहे. तर दुसरी बाजू पाहता शिवसेनाला आपला खाता खोलता आलेला नाही १३ ग्रामपंचायतीमध्ये शिवसेनाला आपला पराभव स्वीकारावा लागला आहे. तर काही ग्रामपंचायतीमध्ये शिवसेनेने उमेदवार देखील उभे केले नव्हते एका बाजूला महाविकास आघाडी अशी चर्चा वेळोवेळी केली जाते परंतु आताच्या झालेल्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचा प्रयोग केला नाही! की केलेला प्रयोग फसला यामध्ये राजकीय विश्लेषक आजही गणिताच्या बेरजा सोडवत आहेत कारण कदाचित महाविकास आघाडी केली असती तर उद्धव गटाच्या शिवसेनेला काही ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पदाचा खाता उघडता आला असता असे मत आज राजकीय विश्लेषक करताना म्हणत आहेत.



## पेण तालुक्यातील २६ पैकी १६ ग्रामपंचायतीवर शेकापचे सरपंच



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील २६ ग्रामपंचायतींचा सरपंच व सदस्यांचा मतमोजणी निकाल जाहीर झाला. त्यात २६ पैकी १६ ग्राम पंचायतीवर शेकापचे सरपंच विजयी झाले तर भाजपचे ४ सरपंच विजयी झाले , अपक्ष सरपंच ३ ग्रामपंचायतीवर निवडून आले. तर ठाकरे , शिंदे, कॉग्रेसने प्रत्येकी १ जांगा जिकंली

पेण तालुक्यात शेकापने आपले वर्चस्व कायम राखले आहे. पेण तालुक्यातील २६ ग्रामपंचायतीवर निवडून आलेले सरपंच : कोलेटी –राजू भोईर, निगडे – कल्पना म्हात्रे, आमटेम लक्ष्मण तांबोळी, डोलवी – परशूराम म्हात्रे, मुंढाणी – सावित्री शेळके, काराव गडब – मानसी पाटील, कोप्रोली – प्रविण पाटील, मसद (बु) – हरिश्चंद्र पाटील, कणे – संगिता पाटील, पाटणोली – नलीनी वाघमारे, हमरापूर – राकेश दाभाडे, कळवे – सतीश पाटील, दादर – तेजस्वी पाटील, सोनखार – दिलीप म्हात्रे, करोटी – सूशांत बरगे, आंबिवली – अरुणा पवार, वाशिवली सखाराम पवार, जिते. सुप्रिया म्हात्रे, दूरशेत – दशरथ गावंड, वरसई – रेखा पाटील, खरोशी – रुपाली पाटील, सावरसई – आरती पाटील, वरप गणेश मनवे, सापोली – सुमन हंबीर, रोडे – दिनेश पवार, मळेघर – आश्लेषा पेणकर हे सरपंच पदाचे उमेदवार विजयी झाले आहेत.